निशाणी क्र.३७

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.८ चा सरतपासः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – नवाब अन्सारमियाँ शेख,

वय – ४३ वर्षे, धंदा– व्यवसाय,

पत्ता – रा.सारोळा रोड, लातूर ता.लातूर, जि.लातूर

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सरकारी अभियोक्ता श्री. व्ही.एन.मेहेत्रे यांचे मार्फत सुरुः–**

दिनांक ३०.११.२०२५ रोजी मला जप्ती पंचनामा करण्यासाठी एम.आय.टी. कॉलेज समोर लातूर–रेणापूर रोडवर लातूर येथे बोलावले होते. त्यावेळी माझ्यासोबत सतिष नामदेव सुर्यवंशी आणि देशमुख नावाचे पोलीस व त्यांचे सहकारी होते. पोलीसांनी त्यांच्याकडील लॅपटॉपवर पंचनामा टाईप केला. पोलिसांनी माझ्या समक्ष आरोपीकडून १०८ चांदीचे पैजन जोड जप्त केले. पंचनामा माझ्यासमक्ष तयार केला. तो मला वाचून दाखवला. तो पंचनामा मी वाचून त्याच्यावर सही केली. (आता मला प्रस्तुत कामातील दि.३०.११.२०२५ रोजीचा नि.२५ वरील जप्ती पंचनामा दाखविण्यात आला) त्या जप्ती पंचनाम्यावरील सही माझी आहे. तसेच त्याच्यावर सतीष सुर्यवंशी आणि देशमुख पोलीसांची सही व आरोपीचा अंगठा आहे. त्यामधील मजकुर खरा व बरोबर आहे. आरोपीकडून जप्त केलेले १०८ चांदीचे पैंजन जोड दाखवल्यास मी ओळखु शकतो. (आता मला जप्त मुद्देमाल व्ही.एम.आर नं.२८/२०२६ वरील १०८ चांदीचे पैंजन जोड दाखवण्यात आले.) ते पैंजन जोड आरोपीकडून जप्त केलेले १०८ पैंजन जोड आहेत. ज्याच्याकडून ते पैंजन जोड जप्त केले त्याचा चेहरा माझ्या लक्षात नाही. (व्ही.सी. वरील आरोपीस साक्षीदाराने पाहून त्यास तो ओळखू शकला नाही.)

**उलटतपास आरोपी तर्फे अॅड. एच.व्ही.गायकवाड यांच्यामार्फत सुरु–**

०२. मी विवेकानंद चौक, लातूर पासून दीड किलोमीटर अंतरावर राहतो. माझ्या व्यवसायामुळे माझा पोलीसांशी संबंध येत असतो. पोलीसांनी माझी अनेक प्रकरणांमध्ये

पंचनाम्यावर सही घेतली आहे. मी जप्ती पंचनाम्यावर दुपारी ३.३० च्या सुमारास एम.आय.टी कॅालेज समोर सही केली होती. पंचनामा करण्यापासून सही करेपर्यंत मी एम.आय.टी कॅालेज समोर होतो. त्या कालावधीत किती वस्तु जप्त केल्या हे मला सांगता येत नाही. माझ्यासमक्ष आरोपीकडून २४२ चांदीचे पैंजन जोड जप्त केले हे मला माहीत नाही. माझ्यासमक्ष आरोपीकडून ५८ चांदीचे करदोडे जप्त केले नव्हते. माझ्यासमक्ष आरोपीकडून १०० चांदीच्या अंगठया जप्त केल्या होत्या का हे मला माहीत नाही. माझ्यासमक्ष सोने जप्त केले नव्हते. जप्ती पंचनाम्यामध्ये अन्य कशाची जप्ती केली ते मी वाचून पाहिलेले नव्हते. माझ्यासमक्ष घटनाठिकाणी जप्त १०८ पैंजन जोडचे वजन केले होते. ते पैंजनजोड कोणत्या कंपनीचे होते ते मला सांगता येणार नाही. मी अहमदपुर येथील सोनाराकडे जाऊन त्या पैंजन जोडचे वजन केले असे घडले नव्हते. मला सोन्याच्या व्यापाऱ्याकडे घेऊन जाऊन वजन केले असे घडले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांना मदत करण्याकरीता मी पंचनाम्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष आरोपीकडून काही जप्त केलेले नव्हते.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

Digitally signed by APARNA SHIVAJI GUNJAVATE
Date: 2026.04.01 10:53:18 +0530

(**श्रीमती.ए.एस.गुंजवटे**)

दिनांक–३०/०३/२०२६.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१,
निलंगा